क्रमांक : ४३९९ /ब कक्ष,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई
दिनांक : २६ फेब्रुवारी, २०२३

:: **परिपत्रक** ::

**विषय : महाराष्ट्र विधानसभेच्या सन २०२३ च्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनातील तारांकित प्रश्नांच्या उत्तराकरिता नेमून देण्यात आलेल्या दिनांकांबाबतचे सुधारित विवरणपत्र ..**

**संदर्भ : या सचिवालयाचे परिपत्रक क्रमांक २६७८/ब, दिनांक १ फेब्रुवारी, २०२३**

विधानसभा कामकाज सल्लागार समितीच्या मंगळवार, दिनांक ८ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार सोमवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ रोजीपासून सुरु होणारे आगामी प्रथम (अर्थसंकल्पीय) २०२३ चे अधिवेशन विधान भवन, मुंबई येथे सुरु होणार आहे. उक्त निर्णयानुसार विधानसभेच्या अधिवेशनाचा कालावधी सोमवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ ते शनिवार, दिनांक २५ मार्च, २०२३ असा निश्चित करण्यात आला आहे. त्यानुसार सोमवार, दिनांक ६ मार्च, २०२३ रोजी होळी हा सण असल्यामुळे सभागृहाची बैठक होणार नाही. तसेच शनिवार, दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी सभागृहाचे कामकाज घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

त्यानुषंगाने **सोमवार, दिनांक ६ मार्च, २०२३ रोजी सभागृहाची बैठक होणार नसल्यामुळे प्रस्तावित गट क्र.१ ची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी शनिवार, दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी चर्चेसाठी घेण्यात येईल.** गट क्र.१ मध्ये १) महसूल, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास मंत्री, २) वने, सांस्कृतिक कार्ये, मत्स्यव्यवसाय मंत्री, ३) रोजगार हमी योजना, फलोत्पादन मंत्री, ४) कृषी मंत्री, ५) सहकार, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री, ६) राज्य उत्पादन शुल्क मंत्री यांचा समावेश असणार आहे.

(मेघना तळेकर)
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रति,**

(१) मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
(२) मा.उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
(३) मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
(४) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
यांना माहितीसाठी तथा कार्यवाहीसाठी अग्रेषित.

D:\Reema\Budget Session 2023\06.03 2023\Paripatak.doc